पोलीस उप आयुक्त, मुख्यालय-२, ठाणे शहर.
कार्यालय पत्ता:- पोलीस आयुक्त, ठाणे शहर कार्यालय,
२ रा माळा, कळवा किक ब्रिज जवळ, सिडको रोड, ठाणे (प),
E-mail Id :- cp.thane.dcphq2@mahapolice.gov.in
Cont. No. :- 022-25343130.



प्रेस नोट

ठाणे पोलीस आयुक्तालयातील पुरुष व महिला पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे नातेवाईकांसाठी कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन केलेबाबत.

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे संकल्पनेतुन ठाणे पोलीस आयुक्तालयातील पुरुष व महिला पोलीस अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन, अंशकालीन कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांचे आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने ठाणे पोलीस आयुक्तालय व ASNAJ Healthcare Education & Research Foundation (AHERF) यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २२ व २३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ०९.३० वा. ते सायंकाळी १७.०० वा. चे दरम्यान सिध्दी हॉल, ठाणे येथे कर्करोग तपासणी वैद्यकीय शिबीर आयोजीत करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये 1) ACI-Cumballa Hill Hospital, Mumbai 2) ASNAJ Healthcare Education & Research Foundation, Mumbai 3) Jaslok Hospital, Mumbai 4) BENZ Hospital 5) Khushi Dental, Bhayndar 6) HCG Cancer Centre, Mumbai या हॉस्पीटल मधील १) पद्मश्री डॉ. रमाकांत देशपांडे २) डॉ. ढाभर ३) डॉ. अबीद सय्यद ४) डॉ. अमजदखान पठाण यांचे सह २५ डॉक्टर व १७ मदतनीस यांनी सेवा दिली. सदर शिबिरामध्ये ठाणे पोलीस आयुक्तालयातील एकूण ६५० पुरुष व महिला पोलीस अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन, अंशकालीन कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांनी लाभ घेतला. सदर शिबिरात पुढील तपासण्या करण्यात आल्या.

1) Oral Cancer check up
2) Fibro Scan of Liver
3) Breast Screening /Scanning
4) PSA,PAP Smear
5) BP, Sugar, Calcium
6) Bone Marrow Density
7) Dental Check up
8) Gynecology
9) Postal Screening, Head & Neck

सदर शिबिरास श्री. आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी भेटी दिल्या.